महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक : ९६६(९)/३५८४/पंधरा दिनांक २८ जुलै,२०२१

**-:प्रसिद्धीपत्रक:-**

**विषय:-** वरिष्ठ संशोधन अधिकारी, गट - अ (श्रेणी - २) आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संचालनालय, आदिवासी विकास विभाग पदसंख्या व आरक्षणातील बदलाबाबत.

**संदर्भ:-** जाहिरात क्रमांक-१५/२०२०

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत वरिष्ठ संशोधन अधिकारी, गट - अ (श्रेणी - २) आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संचालनालय, आदिवासी विकास विभाग(जाहिरात क्रमांक १५/२०२०) संवर्गातील ०७ पदावरील भरतीकरिता दिनांक ११ ऑगस्ट, २०२० रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे.

**२.** सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाच्या आरक्षणाच्या संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल सिव्हिल अपील क्रमांक ३१२३/२०२० या प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ५ मे, २०२१ रोजी दिलेल्या अंतिम आदेशानुसार सदर प्रवर्गाचे आरक्षण रद्दबातल ठरविण्यात आल्यामुळे शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी २०२०/प्र. क्र.३२०/१६-ब, दिनांक ५ जुलै, २०२१ अन्वये भरती प्रक्रिया राबविण्यासंदर्भात शासनाकडून सविस्तर मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाकरिता आरक्षित असणारी पदे अराखीव पदांमध्ये रूपांतरित करुन भरतीप्रक्रीया राबविणे क्रमप्राप्त ठरते.

**३.** प्रस्तुत दिनांक ५ जुलै, २०२१ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीच्या आधारे सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाकरिता आरक्षित पदे अराखीव पदांमध्ये रूपांतरित केल्यानंतर विषयांकित परीक्षेतून भरावयाच्या एकूण ०७ पदांचा सुधारित तपशील खालीलप्रमाणे आहे:-

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | आ.दु.घ. | एकूण आरक्षित पदे | अराखीव पदे | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १ | १ | -- | -- | -- | -- | -- | १ | १ | ४ | ३ | ७ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक /समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | १ | -- | -- | -- | -- | -- | १ | १ | ४ | २ | ६ |
| महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १* | १* |
| खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| दिव्यांग | एक पद अस्थिव्यंगता (Locomotor Disability)/कुष्ठरोग मुक्त(Leprosy Cured)/आम्ल हल्लाग्रस्त(Acid Aattack Victims) | | | | | | | | | | | |

**४.** वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**५.** उपरोक्त पदसंख्येच्या आधारे वरिष्ठ संशोधन अधिकारी, गट - अ (श्रेणी -२) आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संचालनालय, आदिवासी विकास विभाग करीता भरती प्रक्रिया राबविण्यात येईल.

**उप सचिव,सरळसेवा-२**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई**